
नवनीत
मे २०२३

# मुखपृष्ठाविषयी

भीती. आत कुठेतरी साठवलेली. मनात, मेंदूत, जाणिवेत. सगळीकडेच. काहीवेळा शब्दातून, काहीवेळा आवाजातून, हावभावातून तर कधी कधी ती नुसत्या मौनातून व्यक्त होते. पण यावेळी मुलांना भीती व्यक्त करायची होती ती चित्रांतून, आणि निमित्त होते 'भीती' या शाळेच्या वार्षिक प्रकल्प प्रदर्शनाचे.

मुलांशी गप्पा मारताना त्यांना कशाची भीती वाटते असे विचारल्यावर त्यांनी सावल्यांची, जागेची, अंधाराची, प्रेताची, आत्महत्येची असे सांगितले. एकाने आवाजाची भीती वाटते असे सांगितले. आवाजाचा मुद्दा अधोरेखित करत मुलांना भीतीचे आवाज काढायला सांगितले. सुरूवातीला सगळ्याच इयत्तांमधील मुले थोडी लाजली पण मग तोंडावर हात ठेवून हळू आवाज काढू शकता असे सांगितल्यावर मुलांनी बरेच आवाज काढले. या आवाजात कोणता शब्द किंवा अक्षरे होती का हे विचारल्यावर मुलांनी सांगितले कोणतीच नाही, फक्त आवाज होता. मग याच प्रकारे चित्राचा विचार करताना आपण मूर्त आकाराशिवाय अथवा विषयाशिवाय फक्त दृष्यातून भीती दाखवू शकू का असा प्रश्न मुलांना केला. काही दृष्यप्रतिमा मुलांनी पहिल्या आणि मग प्रत्यक्ष कृती करायला घेतली. मुलांनी भीती दर्शवण्यासाठी कागद जाळणे, फाडणे, चुरगाळणे, रंग ओतणे, रंगाचे फटकारे मारणे, ठसे घेणे, माती चिकटवणे, टोकदार वस्तूंचा वापर करून ओरखडे काढणे अशा विविध पद्धती वापरून पाहिल्या.

काही वेळेला त्यांचे त्यांना सापडले, काही वेळा निसटले, पण एक प्रवास सुरू झाला हे नक्की. चित्रकलेची एक नवीन शैली आणि दृष्यप्रकार या निमित्ताने मुलांना अनुभवता आला.

रणजीत कोकाटे, कलाशिक्षक

प्रगत शिक्षण संस्था, फलटण

# नवनीत

## कमला निंबकर बालभवन व आपली शाळा

वार्षिक पत्रिका

प्रगत शिक्षण संस्था, फलटण
वार्षिक पत्रिका

# नवनीत

मे २०२३

**संपादकीय मंडळ (इ. नववी)**

| | | |
|---|---|---|
| अभिनव काळे | रुचिता सातपुते | गणेश धायगुडे |
| प्रणाली कदम | कैफ शेख | शिफा तांबोळी |
| रुचिता घनवट | साक्षी हेंद्रे | आर्यन निंबाळकर |
| निशांत जाधव | श्रावणी मोरे | साया साळवे |
| दिव्य गांधी | सार्थक जाधव | |

**संपादकीय सहाय्य**

मधुरा राजवंशी  कल्पिता दंडवते  विद्यादेवी काकडे  आश्लेषा नागटिळे

**मुखपृष्ठ मांडणी**

रणजीत कोकाटे  हर्षदा शिंदे  कल्पिता दंडवते  मधुरा राजवंशी

**अंकमांडणी**

रमाकांत धनोकर
dhanokar@gmail.com

**रेखाचित्रे**

प्रगती पवार, इ. ६ वी
सोनल गायकवाड, इ. ७ वी
झील कर्णे, इ. ८ वी
सार्थक जाधव, इ. ९ वी

अनेक कथा व कवितांची चित्रे त्या त्या लेखक व कवींनी स्वतः काढलेली आहेत.

**रेखाटन मार्गदर्शक :** हर्षदा शिंदे

**संगणकीय अक्षरजुळणी :** पूनम वाघमारे

**मुद्रण:** ग्रीन ग्राफिक्स,
सी–१०२, सुनिता अपार्टमेंट, १४१७ कसबा पेठ, पुणे ४११०११

**प्रकाशन:** प्रगत शिक्षण संस्था, लक्ष्मीनगर, फलटण ४१५५२३
pragatshikshansanstha@gmail.com
www.pssphaltan.org

# अ नु क्र म


१ गॅदरिंग / ५
२ मोबाइल / ६
३ रामयात्रा / ६
४ बोरं आणि पाऊस / ६
५ आमची निरीक्षणे / ७
६ शाळेतला गरबा / ८
७ उजेडाचे चीज / ८
८ पन्हाळगड / ९
९ रानातले पुस्तक वाचन / १०
१० माझी मांजर / १०
११ होळी / १०
१२ होळीचे दिवस / ११
१३ आता पाऊस पडेल / ११
१४ सुगरण पक्षी / ११
१५ मी अनुभवलेला पाऊस / १२
१६ शाळा / १३
१७ माझा आवडता खेळ / १३
१८ उन्हाळी सुट्टी / १४
१९ पापा की यादें / १५
२० विहीर / १५
२१ पहिला क्रीडामहोत्सव / १६
२२ कुत्र्याचं शेपूट / १७
२३ आमच्या शेतीची कहाणी / १८
२४ तो भयानक दिवस / १९
२५ जगणं / २०
२६ सूत्रसंचालनासाठीची वसवस / २१
२७ मोबाइलचं वेड / २२
२८ अपेक्षांपेक्षा... / २२
२९ चकवा / २३
३० दारी / २४
३१ बाजीगर / २६
३२ गणित, गणेश आणि मी / २८
३३ इटली से लाई केटली / २९
३४ साइकिल / ३०
३५ लड़ाई / ३१
३६ सच्चा दोस्त / ३१
३७ पैसा काय आहे? / ३२
३८ टेलिस्कोप / ३३
३९ गुलाबी पँट-शर्टवाली मुलगी / ३४
४० Seriously! Are You an Alien? / ३५
४१ My Amazing Class / ३६
४२ Our Little River / ३६
४३ Children's Parliament / ३८
४४ Discrimination / ३९
४५ Like a rainbow / ४०
४६ Team India! / ४०

# संपादकीय

मुले त्यांच्या जीवनातील विविध अनुभव लेखनातून कागदावर उतरवत असतात. त्यांचे विचार, त्यांची मते निर्भिडपणे मांडत असतात. या सर्वांतून निवडलेले अतिशय उत्तम आणि नाविन्यपूर्ण साहित्य दर वर्षी 'नवनीत'च्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचत असते.

याही वर्षीच्या नवनीतमध्ये अशाच आगळ्यावेगळ्या साहित्यकृती आपल्याला वाचायला मिळणार आहेत. मग तो निशांतचा गणितातील सामान्य विद्यार्थी ते गणिताचा डॉन बनण्याचा प्रवास असो किंवा दिव्यचा टेलिस्कोप जोडणीचा अनुभव. नंदिनीची पक्ष्यांबद्दल नवीन गोष्टी जाणून घेण्याची ओढ, आयुक्तीची जीवनाकडे बघण्याची आगळी दृष्टी, शेती मुळीच सोपी नसते हे सोनलला आलेले भान हे त्यांच्या लेखनातून आपल्यापर्यंत पुरेपूर पोहोचते.

ग्रंथालयात पुस्तक वाचून झाल्यावर ताईंनी पाचवीच्या मुलांना सांगितले की लेखकाने जसे डासाचे बारीक निरीक्षण केले आहे तशी तुम्ही तुमचीही निरीक्षणे लिहा. आणि यातूनच पुढे आली मुलांची मुंग्या, कुत्री, साप, डोळा या गोष्टींची भन्नाट निरीक्षणे! भूतप्रेताच्या अफवांना साथ न देता सत्य समोर आणण्याचा आपला प्रवास आदीबाने तिच्या लेखातून व्यक्त केला आहे. वडिलांशी असलेले उत्कट नाते राजेश्वरी आणि श्रेयाच्या लेखनातून डोळ्यांसमोर उभे राहते. हे लेखन करण्यासाठी त्यांनी किती धीर गोळा केला असेल हे वाचताना जाणवत राहते.

झीलला बालसंसदेत सहभागी होण्याची फारशी इच्छा नव्हती पण मैत्रिणींनी तिचे नाव पुढे केले आणि ती निवडून आली. हा संपूर्ण प्रवास तिने अतिशय विश्लेषणात्मक पद्धतीने मांडला आहे. बाणगंगा नदीला भेट दिल्यानंतर नदीतल्या हालचाली, सुखावणारा वारा, नदीचे सौंदर्य हे आठवीतील मुलांनी त्यांच्या तरल इंग्रजी कवितांमधून मांडले आहे. तुकबंदी म्हणजे शब्दांची जुळवाजुळव करून तयार केलेले काव्य. सातवीच्या मुलांच्या अनोख्या तुकबंदियाँ जाता जाता हसवून जातात.

यावेळचे नवनीत काही खास आहे. तसे खास ते नेहमीच असते, पण यावेळी अधिक खास कारण यावेळी आम्ही नववीच्या मुलांनी याच्या संपादनाचे काम केले आहे. मुलांच्या लेखनामागील त्यांच्या भावना, त्यातील सखोल अर्थ आम्हाला संपादन करताना समजला. आपल्याच शाळेमध्ये अतिशय वैविध्यपूर्ण पार्श्वभूमीतून येणाऱ्या विद्यार्थ्यांचे लेखनही केवढे वैविध्यपूर्ण असते हे पहिल्यांदाच जाणवले. मुलांशी त्यांच्या लेखनाबद्दल बोलून सुधारणा सुचवताना आपण खूप मोठे झालो आहोत असे वाटले.

आम्हाला हे सगळे लेखन वाचताना जेवढी मजा आली तेवढीच मजा तुम्हालाही येईल असे वाटते.

**रुचिता सातपुते, गणेश धायगुडे,**
**अभिनव काळे**
**इ. नववी**

# गॅदरिंग



आमच्या शाळेत गॅदरिंगला संध्याकाळी आलो होतो. सगळी मुलं नाचत होती. लाईट, साऊंड लावला होता. बायका, पोरं, माणसं, ताई सगळेजण खालून बघत होते. बाजूला पडदे लावले होते. आमच्या स्टेजच्या मागे कमला निंबकर नाव लिहिले होते. रंगीत लाईट लावल्या होत्या.

**प्रथमेश मेंगावडे**

बालवाडी मोठा गट




शाळेचा डान्स होता. तो बघायला खूप जण आले होते. मी वेलकम, टप टप पडती, बम बम बोले या गाण्यांवर नाच केला. आम्ही सगळे खूप छान नाचलो. नाच संपल्यावर आम्ही सगळे घरी गेलो. नाच बघायला मम्मी, पप्पा, दादा आले होते.

**आयुष अहिवळे**

बालवाडी मोठा गट, आपली शाळा



माझा डान्स पाहायला मम्मी, पप्पा आलेले. मम्मी स्टेजच्या खाली बसून डान्स बघत बसली होती. पप्पा फोटो काढत होते. मी स्टेजवर डान्स करत होते.

**त्रिशा रोकडे,**

बालवाडी मोठा गट, आपली शाळा

## रामयात्रा



फलटणमध्ये रामयात्रा येती. मम्मी, पप्पा, मी रामयात्रेत गेलो होतो. तिथे गेल्यावर वडापाव खाल्ला. पाळण्यात बसलो. मम्मीने मला फुगा घेतला. रामयात्रेत लय गर्दी होती.

**माही काकडे**

बालवाडी शिशुगट, आपली शाळा

## बोरं आणि पाऊस



एक असतो मुलगा. त्याचं बोराचं झाड असतं. बोरं झोपलेली असतात. झोपलेल्या बोरांना मुलगा उठवतो. सकाळ झाली, उठा, दात घासायची वेळ झाली. मग पाऊस येतो. मुलाला आनंद होतो. पाऊस गेल्यावर इंद्रधनुष्य येतो. इंद्रधनुष्याला ढग हाताला येत नाहीत.

**आदर्श अहिवळे**

बालवाडी मधला गट

## मोबाइल




प्रिय पप्पा, मम्मी, मला तुम्ही खूप आवडता. तुम्ही रात्री खूप वेळ मोबाइल बघता त्यामुळे तुम्हाला त्रास होईल. मोबाइल न घेता पार्कला फिरायला नेले पाहिजे.

**अंश गरड**, बालवाडी मोठा गट

माझ्या पप्पांनी मोबाइल कमी बघून माझ्याशी खेळलं पाहिजे. गोष्ट सांगितली पाहिजे. मोबाइल कमी करा नाहीतर तुमचा मेंदू काम करायचा कमी होईल. नसांना त्रास होईल. मला तुम्ही खूप आवडतात पण मोबाइल कमी केला पाहिजे. मम्मी जरा कमीच मोबाइल बघते.

**तस्मिया पठाण**

बालवाडी मोठा गट

# आमची निरीक्षणे (इ. पाचवी)

मला मुंगीचे निरीक्षण करायचे होते. मग मी विचार करू लागले की मुंगीचे निरीक्षण कसे करू? मी साखरेचे दोन दाणे बाहेर काढून ठेवले. तिथे थोड्या वेळाने एक लालभडक मुंगी आली आणि साखरेच्या दाण्यावर चढून परत खाली उतरली. मग ती जिथून आली होती तिकडे परत गेली. मी विचारात पडले. पण दोनच मिनिटांमध्ये ती तिच्या पूर्ण कुटुंबालाच घेऊन आली. हे कुटुंब म्हणजे १० मुंग्या. त्यांनी ५-५ चे दोन गट केले आणि एका गटाने एक असे साखरेचे दोन्ही दाणे उचलून नेले. आणि तुम्हाला माहीत आहे का की ती लाल मुंगी जेव्हा साखरेच्या दाण्यावर चढली होती तेव्हा तिने गंधकण सोडले होते. त्याचा वास घेत घेत ती परत साखरेपाशी आली होती.

**प्राजक्ता काकडे**



मी माझ्या मामाच्या गावाला गेलतो तेव्हा मी एक साप कात टाकताना पाहिला. मी त्याच्याकडे टक लावून बघत होतो. पहिल्यांदा तो खडकाळ जागेत जाऊन स्वतःला घासायला लागला. तो हळूहळू पुढे सरकत होता. कात काढण्याआधी त्याची त्वचा थोडी लाल झाली होती. मला ते बघताना असे वाटले की त्याला पुढे सरकताना दुखत असेल का. त्याची कात काढून झाल्यावर तो खूप चमकत होता. तो खूपच सुंदर दिसत होता.

**राजवीर निंबाळकर**




मी माझ्या काकाच्या गावाला गेलतो. त्याने एक कुत्र्याचे पिल्लू पाळले होते. ते पांढऱ्या रंगाचे होते. ते एका कोपऱ्यात बसले होते. मी तिथे गेल्यापासून त्याच्याकडेच बघत होतो. ते हातावर हात ठेऊन शांत बसले होते. त्याने श्वास घेतला की त्याचे शरीर जरा वरती उचलले जायचे. कोणी हात लावायला गेले तर ते मिशी खाली वर करायचे आणि लाजल्यासारखे मान खाली घालायचे.

**देवेंद्र धवडे**

मी एके दिवशी आरश्यासमोर उभे राहून माझ्या डोळ्याचे निरीक्षण करत होतो. सहज बघून काही दिसत नव्हते म्हणून मी डोळ्यांना ताण दिला तेव्हा खूप लाल झरक शिरा दिसू लागल्या. डोळ्यामध्ये एक छोटा गोल होता काळ्या रंगाचा. त्या गोलाच्या बाजूने आणखी एक गोल होता. तो थोडा चॉकलेटी होता. मला हे बघून फार छान वाटले. म्हणून मी आता सारखे डोळ्याचे निरीक्षण करतो.

**शिवेंद्र खलाटे**

## आमची निरीक्षणे
### (इ. पाचवी)

माझी मम्मी एकदा फरशी पुसत होती तेव्हा मी माझ्या मांजरीचं निरीक्षण करत होते. मांजर गॅलरीतल्या एका कुंडीत बसली होती. मग ती खाली उतरली आणि तिनं फरशी चाटली. दुपारी ती थोडी वेगळीच वागत होती. मला वाटत होतं की तिला चक्कर येत आहे. ती पेंगत होती आणि गरगरल्यासारखं करत होती. नंतर मी तिला मांडीवर घेतलं आणि थोपटलं. मग ती शांत झोपली.

**रिद्धी अडसूळ**

मी आमच्या शाळेच्या कॉफी कुत्रीचे निरीक्षण केले. आम्ही झोका खेळत होतो तेवढ्यात तिथे कॉफी आली. तिच्या तोंडात चपाती होती. तिने बांबूच्या जवळ पुढच्या दोन पायांनी एक खड्डा खणला. त्याच्यामधली माती बाहेर काढली. चपाती त्या खड्ड्यात ठेवली आणि त्यावर नाकाने पुन्हा माती टाकली. मग माझ्या लक्षात आले की तिने एकच चपाती पुरली होती. तिच्या तोंडात आणखी एक चपाती होती. ती पुढे गेली. आम्ही तिचा पाठलाग केला. तिने गवती चहाच्या आळ्यापाशी परत एक खड्डा केला व त्यात उरलेला खाऊ पुरला.

**श्रीजा बोबडे**

## शाळेतला गरबा

मी शाळेत गरबा खेळला. मला आवडला. गरबा खेळायला सगळी मुले-मुली होती– पहिली, दुसरी, तिसरी आणि चौथी. आम्ही गरबा गोलात खेळत होतो. मध्ये टेबल ठेवला होता. त्याच्यावर मोबाईल ठेवून गाणी लावलेली. ताई दाखवत होत्या आणि आम्ही नाचत होतो. गोल गोल फिरत खूप गरबा खेळला.

**श्रीराज नाळे,** इ. दुसरी




## उजेडाचे चीज

सूं सूं सूं सूं वारा सुटला
धाड धाड धाड ढग फुटला
लाईट गेली
वीज चमकली
स्पर्श जाणवला थंड
डोकं पडलं बंद
भास झाला भुताचा
आत्मविश्वास गमवला स्वतःचा
तितक्यात आली वीज
मग समजले उजेडाचे चीज

**गाथा भुजबळ,** इ. पाचवी

# पन्हाळगड

आम्ही दादाला भेटायला कोल्हापूरला गेलो होतो. दादाला भेटल्यानंतर महालक्ष्मी मंदिरात जाऊन आलो तरी आमच्याकडे खूप वेळ होता. मग आम्ही दादाला विचारले की फिरायला काय काय आहे ? मग त्याने पाच–सहा ठिकाणांची नावे सांगितली. मला पप्पांनी विचारले की कुठे जायचे मिताली ? मग मी म्हणाले की मला पन्हाळगड पहायचा आहे. मग आम्ही निघालो पन्हाळगड पाहायला.

पन्हाळा किल्ल्यांकडे जाताना चौकामध्ये बाजीप्रभू देशपांडे यांचा मोठा पुतळा आहे. हा किल्ला खूप मोठा आहे. त्यावर मोठा राजवाडा आहे. खूप जुने महालक्ष्मीचे मंदिर आहे. किल्ल्यावर एक सज्जा कोठी आहे. इथे शिवाजी महाराजांच्या गुप्त बैठकी होत होत्या असे म्हटले जाते. किल्ल्यावर अंबरखाना आहे. तिथे तीन धान्य कोठारे आहेत. त्यांची नावे गंगा, यमुना, सरस्वती. गडावर एक मोठी धर्मकोठी आहे. तेथून गोरगरिबांना दानधर्म केला जात असे. किल्ल्यावर खूप उंचच्या उंच दगडी इमारती आहेत. पन्हाळगडावर छत्रपती शिवाजी महाराज पाचशेहून अधिक दिवस राहिले होते. या गडावर एकवीस गुप्त गुहा आहेत.

किल्ला खूप छान आहे. परंतु पाहायला येणाऱ्या लोकांनी गडावर खूप कचरा केला आहे. कचराकुंडी असूनसुद्धा लोकांनी त्यात कचरा न टाकता इतर ठिकाणी फेकला आहे. अशा कचऱ्याने खराब झालेला किल्ला मला आवडला नाही. आपल्या देशातील किल्ला आपल्या देशातील लोकच खराब करत आहेत याचे मला खूप वाईट वाटले. आम्ही आमच्याजवळ झालेला कचरा पिशवीत भरून घरच्या कचऱ्याच्या डब्यात टाकण्यासाठी घेतला.

किल्ला पाहून दमल्यामुळे खूप भूक लागली होती. त्यामुळे मस्तपैकी सातबारा हॉटेलला बटर चिकन पोट भरून खाल्ले आणि येताना गाडीत गाढ झोपी गेले.

**मिताली महामुनी,**
इ. चौथी



# रानातले पुस्तक वाचन



मी आणि आजी रानात जातो. आम्ही गाई चारण्यासाठी माळावर जातो. आम्ही जाताना पुस्तकपण घेऊन जातो. मी आजीला गोष्टी सांगतो, कविता म्हणून दाखवतो आणि शाळेतील गमतीजमतीपण सांगतो. मला पुस्तक वाचायला खूप आवडते आणि मी वाचलेले आजीला सांगायला आवडते. आजीला गोष्टी ऐकायला आवडते. आमच्या गाई चरतात आणि मी आणि आजी एका दगडावर बसतो. मी पुस्तकातील गोष्टी, कविता वाचतो. आजी ऐकते. मी आजीला पण शिकवतो कविता. मग आजीपण म्हणते.

**साईराज बोडरे,** इ. दुसरी

## माझी मांजर

एक होती माझी छान छोटी मांजर,
ती होती खूपच सुंदर.
दूध प्यायची खूप खूप,
तिला आवडायचे तूप.
मी शाळेत जाताना बसायची रुसून,
मी शाळेतून आल्यावरती बघायची माझ्याकडे हसून.
आम्ही दोघी खेळताना तिची आई बघायची मायेने,
जेव्हा मी तिला दूध द्यायची हाताने.
पण एके दिवशी ती हरवली.
आजही तिची मला येते आठवण,
तीच होती माझी मैत्रीण.

**नेत्रा काळे,**
इ. तिसरी



## होळी

होळीदिवशी नवीन कपडे घातले. पुरणपोळी खाल्ली. होळीसाठी लागणारे साहित्य जमा करायला मदत केली. आम्ही होळीदिवशी रंग खेळलो. होळीभोवती ओरडलो. होळीच्या दुसऱ्या दिवशी होळीत टाकलेली नाणी शोधली व ती घासून काढली. खूप मजा आली.

**प्राणवी मोरे,** इ. पहिली

## होळीचे दिवस

मी शाळेतून घरी आले. मम्मीने होळीच्या पोळ्या वगैरे केल्या होत्या. फक्त भजी करायची राहिली होती. मी मम्मीला डब्यातून बेसन काढून दिलं. मम्मीनं पटपट भजी करून निवदाचं ताट केलं. त्यात भात, त्यावर आमटी, कुरड्या, पाणी वगैरे ठेवलं. आजीनं नारळ, हळद–कुंकू घेतलं. होळी चालू होणारच होती तोवर आम्ही पोचलो.

होळीनं चांगलाच पेट घेतला. आग लांबपर्यंत लागली. मी आजीला म्हणाले की मला निवद ठेवता येत नाही, तू ठेव. आजीनं निवद वाहिला आणि मग तांब्यातलं पाणी गोल आकारात ओतलं. ते सगळं झालं की मी, आजी आणि दादा म्हसोबाच्या मंदिरात गेलो. मुलींनी किंवा बायकांनी म्हसोबाला शिवायचं नसतं म्हणून दादानं हळद, कुंकू, गुलाल वाहिला. अंड ठेवलं.

रंगपंचमी पाच दिवसांवर आलेली. अंकलनं आम्हाला रंग आणायला पैसे दिले होते. आम्ही काचीकलर, चिमणीकलर आणले. मम्मी खवळेल म्हणून लपवून ठेवले. राहिलेल्या पैशाची पन्नास अंडी विकत घेतली. आमच्या घराशेजारी एक बांधकाम सुरू होतं. तिथं खडीची कच टाकली होती. दादानं कचच्या ढिगात खड्डा केला आणि सगळी अंडी इडाळण्यासाठी पुरून ठेवली. आम्ही सगळे रंगपंचमीची वाट पाहू लागलो. कुणाच्या अंगावर अंडी कधी आणि कशी फोडायची ते ठरवायला लागलो.

दोन दिवसांनी आम्ही अंडी सुरक्षित आहेत का बघायला गेलो तर घराचं काम सुरू झाल्यामुळं सगळी अंडी फुटलेली. खूप वाईट वाटलं. रंगपंचमीचे सगळे मनसुबे फिस्कटून गेले.

**मानसी हुंबरे,** इ. सहावी



## आता पाऊस पडेल

आता पाऊस पडेल
सूर्य ढगांच्या आड लपेल
हवेच्या उष्णतेत गारवा मिसळेल
आता पाऊस पडेल

आकाशात ढगांचा गडगडाट उडेल
संगतीत चतुरांच्या पावसाचा इशारा मिळेल
आता पाऊस पडेल

अंगणातल्या झाडांवर पाणी पडेल
पानांच्या गप्पांचा सळसळाट उडेल
झाडांचा आनंद सर्वत्र विखुरेल
आता पाऊस पडेल

जननी ओलीचिंब बनेल
मातीच्या सुगंधात पावसाचा गौरव थरारेल
आता पाऊस पडेल

थंड या हवेत मी कणीस भाजेन
कणीस खात खात कविता करेन
आता पाऊस थांबेल.

**श्रेयस आडके,** इ. सहावी

## मी अनुभवलेला पाऊस

पावसाळा माझा आवडता ऋतू आहे. पावसात मित्रांसोबत खेळायला, शाळेत जाताना भिजायला मला फार आवडते. एकदा का शाळा सुरू झाली की मी पावसाची वाट बघत असते. पावसाच्या वाहत्या पाण्यात जहाज बनवून सोडणे हा माझा आवडता खेळ आहे.

मला रिमझिम पाऊस आवडतो. परंतु माझा मागील वर्षीचा पाऊस मला आजही लक्षात आहे. रात्रीची वेळ होती. घरातील सर्वजण झोपायची तयारी करत होते. तेवढ्यात जोरजोरात वारे सुटू लागले आणि वीज कडाडण्यास सुरुवात झाली. पाऊस कोसळायला लागला. मुसळधार पावसाच्या आवाजाने मी घाबरले. पाऊस इतका जोरात होता की रस्त्यावरती झाडे तुटून पडली. नंतर कळाले की काही लोकांच्या घरात पाणी शिरले होते. रस्त्यावरची वाहतूक ठप्प झाली त्यामुळे काही लोक घरी पोहोचू शकले नाहीत. हा पाऊस रात्रभर चालू होता.

सकाळी पाऊस पडायचे थांबल्यावर हळूहळू जनजीवन सुरळीत व्हायला लागले. ती पावसाची रात्र मी कधीच विसरणार नाही.

**श्रावणी धापटे,** इ. चौथी



## सुगरण पक्षी

मला रविवारच्या दिवशी खूप बोअर होते. कारण शाळेला सुट्टी असते ना! पण आजचा रविवार वेगळा होता. आज आई मला एक पक्षी दाखवणार होती. तो कोणता पक्षी असेल, कसा असेल, मला खूप उत्सुकता होती. मी आईला खूप प्रश्न विचारत होते.

आईने मला खिडकीपाशी नेले. मग खिडकीतून मला सुगरण पक्षी दाखवला. तो इतका छान होता! असा सुंदर पिवळा पक्षी मी पहिल्यांदाच बघत होते. त्याने झाडावरती लटकलेले घरटे बांधलेले होते. आई मला माहिती सांगू लागली. तो स्वतःच चोचीने घरटे बांधतो. घरटे बांधण्यासाठी ओले गवत वापरतो.

आज तिथे आणखी एक सुगरण पक्षी नवीनच आलेला होता आणि त्यानेपण घरटे बांधायला सुरुवात केली होती. आईने सांगितलेले तसेच तो गवत चोचीत आणून स्वतः घरटे बांधत होता. आई म्हणाली की नर घरटे बांधतो आणि मादीला ते आवडले तरच ती त्या घरट्यात राहायला येते. आता रविवारी मला बोअर होत नाही कारण मी दर रविवारी वेगवेगळे पक्षी पाहते. खूप मजा येते.

**नंदिनी धुमाळ,** इ. पाचवी



# शाळा

माझे या शाळेत सहावीमध्ये ॲडमिशन झाले. सुरुवातच ऑनलाईन तासांनी झाली. त्यामुळे कुणाची एवढी ओळख नव्हती. प्रत्यक्ष शाळेत येताना पहिल्या दिवशी खूप भीती वाटत होती की आपल्याला शाळा माहीत नाही. वर्ग कुठे असेल, आत कशी जाऊ, माझ्याशी मैत्री करतील का असे प्रश्न मनात येत होते. धीर करून गेटच्या आत गेले. शिक्षक सगळ्या मुलांचे टेम्परेचर चेक करत होते. मला मधुरा ताई दिसली. ती माझ्याकडे बघून हसली. माझे मन शांत झाले. वाटू लागले की आपल्याला कुणीतरी ओळखते.

आमचे आमच्या वर्गशिक्षिका विद्याताईंनी दोन गट केले. मी विज्ञानाच्या गटात होते. शाळेच्या पहिल्याच दिवशी पहिल्याच तासाला वर्गात जाण्याऐवजी मी प्रयोगशाळेत गेले. मी पहिल्यांदाच प्रयोगशाळा बघत होते. तिथे एक सापळा लटकत होता आणि काचेच्या बाटल्यांमध्ये वेगवेगळे प्राणी ठेवलेले होते. गीता ताई विज्ञानाच्या शिक्षिका होत्या. त्या नुसतं वाचून दाखवत नव्हत्या. आमच्याशी गप्पा मारत होत्या, प्रश्न विचारत होत्या, समजून सांगत होत्या. माझ्यासाठी हा पूर्णपणे वेगळा अनुभव होता.

पहिला तास झाल्यावर आम्हाला खेळायला सोडले. मी हळू हळू चालत जात होते कारण माझी कुणाशी मैत्री नव्हती. तेवढ्यात एका मुलीने मला हाक मारली आणि खेळायला बोलावले. नंतर मला समजले की तिचे नाव आदीबा होते. आम्ही लंगडी खेळलो. मग माझ्याशी हळू हळू सगळ्या मुली बोलायला लागल्या. शाळेमध्ये मजा यायला लागली. स्काऊट गाईड, कार्यानुभव हे विषयच मला आधी माहीत नव्हते. या तासांना खूप नव्या गोष्टी शिकायला मिळाल्या.

काही दिवसात वर्गातील मुले आणि शिक्षक म्हणायला लागले की प्रकल्प येणार आहे. मला वाटले की काहीतरी लिखाण देतील. कशाबद्दलतरी माहिती लिहायला लावतील. पण प्रकल्प सुरू झाला तेव्हा समजले की यात खूप मजा आहे. आम्हाला शेतीपूरक व्यवसाय हा विषय होता. आम्ही वेगवेगळ्या गटांमध्ये गोठा, गांडूळखत प्रकल्प, पोल्ट्री अशा ठिकाणी भेटी द्यायला गेलो. मी चौधरवाडी येथे गोठ्याला भेट देण्यासाठी गेले होते. मी याआधी तीन–चार गाईंचाच गोठा पाहिला होता. हा खूप मोठा गोठा होता. प्रकल्पासाठी लेखन करणे, चित्र काढणे, मॉडेल बनवणे असे मला आयुष्यात पहिल्यांदाच करायला भेटले. मला ही शाळा खूप आवडते. मला माहीत नसलेल्या अनेक गोष्टी मला इथे कळल्या आणि ज्या माहीत होत्या त्या स्वतःहून करायला मिळाल्या.

**अक्षरा घोरपडे,** इ. सातवी

# माझा आवडता खेळ

माझा आवडता खेळ  
तो पाहत मी खातो भेळ  
माझा आवडता खेळ खोखो  
दुसरे खेळ मला नको नको  
एकदा लागलो मी खेळायला खेळ  
मग मला कळत नाही किती झालाय वेळ

**सुहास दंडिले,** इ. तिसरी



# उन्हाळी सुट्टी

आम्हाला उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागतातच मी, माझी मम्मी आणि दादा आम्ही तिघेही मामाच्या गावाला झडकाईच्या वाडीला गेलो. काही दिवसांनी माझे छोटे मामा व त्यांची मुलेही गावाला आली. आम्ही सगळे एकत्र आल्यावर खूप छान वाटायचं. मन रमून जायचं. गाव डोंगराच्या मध्ये असल्यामुळे दिसायला छान दिसायचं. छोटंच पण टुमकीदार. गावच्या देवळातील घंटा सकाळचं वातावरण प्रसन्न करायची.

आम्ही सर्वजण रोज रानात जायचो. शेतात इकडून तिकडे फिरायचं, पाटाला सोडलेल्या पाण्यात नाचायचं, शेळ्यांच्या बारक्या करडांबरोबर खेळायचं, गाईच्या वासराला अंघोळ घालायची, कोंबड्यांच्या पिल्लांशी गप्पा मारायच्या आणि रानातल्या कुत्र्यांशी शेक हँड करायचा, असले आमचे उद्योग चालायचे. फार मजा यायची. थकल्यानंतर रानातल्या पिपरनीच्या झाडाखाली जाऊन बसायचो. तिथं गप्पा मारत ऊस खायचो. रानातून घरीच जाऊ वाटायचं नाही.

एकदा आम्ही मामासोबत बाणगंगा धरण बघायला गेलो. चार गाड्यांवर तिघं तिघं बसून गेलो. बाणगंगा धरण साखर कारखान्याच्या तिकडे असल्यामुळे आम्हाला पोहोचायला जरा उशीर झाला. कारखान्याकडे जाणाऱ्या उसाच्या वाहतुकीची लाईनच लागली होती. रस्ता बारीक असल्यामुळे ट्रॅफिक जॅम झाल्यासारखं वाटत होतं. तरी आम्ही बाजूबाजूनी वाट काढत गेलो.

आम्ही पोहोचल्यावर घाटाच्या पायथ्याशी गाड्या लावल्या आणि पायवाटेवरून बाणांच्या दिशेनं धरणाकडे जाऊ लागलो. उन्हाळा असल्यामुळे फार कुसळं होती. दगडधोंड्यातून, छोट्या ओढ्यातून, काट्याकुट्यातून आम्ही पुढे चाललो होतो. आम्हाला करवंदाची झुडपं दिसली पण त्याला करवंदं नव्हती. चालता चालता मामाच्या मुलीचा पाय घसरला आणि ती धपकन पडली. ते पाहून आम्ही लागलो हसायला. ती पण खूप हसत होती. त्या सगळ्या प्रवासात आम्हाला एकही माणूस दिसला नाही. मामा म्हणाला, ही नक्की फिरायचीच जागा आहे ना?

पुढे आम्हाला तीस–चाळीस वानरांची झुंड दिसली. त्यातली काही आम्हाला पाहून दात काढून विचित्र आवाजात ओरडायला लागली. आम्ही सगळे घाबरलो आणि लगेच माघारी फिरलो. डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या उपळवे गावातून आमच्या गावाला येण्यासाठी कच्चा रस्ता होता. तिथून पटकन घरी पोचलो.

घरी आल्यानंतर आमची चर्चा झाली. उन्हाळ्यामध्ये दुपारच्या दीड–दोन वाजता कोण जातं फिरायला? म्हणून तर एकपण माणूस नव्हता दिसला. पण तो दिवस आठवला की अजूनही छान वाटतं कारण खूप मजा आली होती.

**समिधा घोरपडे,**
इ. आठवी



## पापा की यादें




सूरज में देखूँ, चाँद में ढूँढूँ, मेरे प्यारे पापा
ढूँढकर थक जाऊँ तो आ जाता है रोना
रोते देख आ जाते हैं पापा मेरे पास
आँखे पोछकर कहते हैं, तू है मेरी खास
रोना नही बेटा, मैं हूँ तेरे साथ
चलो उठो अब हँसकर भूलो सारी बात
समझ ना आए अगर कोई बात पढाई में
पापा आकर समझाएँ तो समझ जाऊँ चुटकी में
सपनों मे पापा आकर बहुत हँसाते है
लेकिन सुबह उठती हूँ तो गायब हो जाते हैं
पता नही ऐसा क्यों होता है मेरे साथ
जाते जाते सपनों में गुजर जाती है रात
बुरा लगता है कि वे अब नहीं हैं मेरे पास
अब तो रहते हैं वे गॉड के ही साथ
अंतिम परीक्षा के लिए पापा, देना आशीर्वाद
बाकी सारी बात तो अब होगी अगली रात

**राजेश्वरी भिरंगी,** कक्षा ५

## विहीर

अगं अगं विहिरी
वाटे मला तुझी भीती
खोल खोल पाण्याची
मोठ-मोठ्या दगडांची
कधी असते तू छोटी
तर कधी असते तू मोठी
आकार तुझा गोल गोल
उंची तुझी खोल खोल
काळीकुट्ट अंधारी
सतत मला घाबरवणारी
शेतात आमच्या राहणारी
पिकांची तहान भागवणारी
लागल्यावर मला सुट्टी
होईल का आपली गट्टी ?
येईन मी पोहायला
तुझ्या पाण्यात तरंगायला

**श्रीशा गायकवाड,**
इ. चौथी



# पहिला क्रीडामहोत्सव

माझे कमला निंबकरमध्ये शिकण्याचे पहिलेच वर्ष होते. शाळेच्या पहिल्या दिवसापासूनच वर्गातल्या सगळ्या मुलांच्या तोंडात एकच– क्रीडामहोत्सव. बास! मला क्रीडामहोत्सव म्हणजे काय हे काहीच माहीत नव्हते. मग दोन–तीन दिवसांनी रिक्षामध्ये वर्गातील मनस्वीशी माझी मैत्री झाली. तिने मला हे सारे समजावून सांगितले. मग काय, मी पण तेच धरून बसलो.

अखेर तो दिवस आला. दहावीचे ताई–दादा वर्गात वेगवेगळ्या खेळांसाठी आमची नावे घेण्यासाठी आले. माझा आनंद गगनात मावेना. नावे देऊन मी क्रीडामहोत्सवाची आतुरतेने वाट पाहू लागलो.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी मी एका खेळात भाग घेतला होता. त्यात तोंडात एक स्ट्रॉ घ्यायची आणि त्यात एक–एक वाटाणा घेऊन वाटीमध्ये टाकायचा. माझे नाव आले तेव्हा मी घाबरलो. पण धीर करून तो खेळ खेळला आणि त्यात मी जिंकलो सुद्धा. मग दुसरा खेळ ट्रेजर हंटचा होता. त्यात आम्ही हरलो. त्या एका दिवसात माझी वर्गातल्या सगळ्यांशी मैत्री झाली.



दुसऱ्या दिवशीचा क्रीडामहोत्सव विमानतळाच्या मैदानावर होता. पहिल्यांदा रीले आणि स्लो सायकलिंग होते. आणि त्यानंतर क्रिकेट! आम्ही पाचवीत असल्यामुळे आमची क्रिकेटची पहिलीच मॅच होती. पण जसे आम्ही मैदानात उतरलो, चारी बाजूंनी फक्त सहावीचा जयघोष चालू झाला. या गोंधळात खेळणे व जिंकणे अशक्य होते. आमचे पहिलेच वर्ष होते. सहावीला अनुभव होता. हे नक्की होते की जिंकणार तर सहावीच. आमची पहिली बॅटिंग होती. मी तर पहिल्या बॉलमध्येच आउट झालो. पण माझ्या मित्रांनी बरेच चौके–छक्के मारले. दहा ओव्हर्समध्ये आमच्या ऐंशी धावा झाल्या. जिंकण्याची शक्यता तर वाटत होती, पण फिल्डिंगमध्ये आम्ही सहावीसमोर गुडघेच टेकले.

सामना हारलो पण फारसे दुःख नव्हते कारण सगळ्यांचेच लक्ष फक्त नववी व दहावीच्या क्रिकेट मॅचकडे होते. माझ्या मित्रांनी मला या दोन वर्गांबद्दल एवढे काय काय सांगितले होते की मी हा सामना कधी बघतो असे मला झाले होते. दरवर्षी या दोन संघात अटीतटीचा सामना होतो आणि बाकीचे सारे वर्ग आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करतात. मी प्रत्यक्ष अटीतटीचा सामना कधीच पाहिला नव्हता. शेवट तो क्षण आला. सगळीकडे दोन्ही वर्गांचा जयघोष चालू होता. इकडून एक जण भोंगा वाजवायचा तर पलिकडून एक जण! आमचा वर्ग नववीला सपोर्ट करत होता. नववी हारली, पण शेवटच्या बॉलपर्यंत असे काही झटत होते की बघायला खूप मजा आली. अशा तऱ्हेने माझा पहिला क्रीडामहोत्सव पार पडला. सगळ्यांशी मैत्री झाली. खूप नवीन अनुभव आले.

**यश साठे,** इ. आठवी

# कुत्र्याचं शेपूट

मी फलटण शहरात ७ ब, लक्ष्मीनगर येथे राहते. माझ्या घराशेजारी आज कमला निंबकर बालभवन ही शाळा आहे आणि मी स्वतः त्या शाळेत शिकत आहे. माझे आजोबा इथे त्यांच्या लग्नाच्या आधीपासून राहतात. त्यांना या ठिकाणची सगळी माहिती आहे.

मी जेव्हा लहान होते तेव्हा मी आपल्याच तंद्रीत असायचे. दुसऱ्या लोकांशी मला काही देणे-घेणे नसायचं. पण जशी मी मोठी होत गेले तसे माझ्या कानावर थोडे विचित्रच प्रकार पडायला लागले. थोडे म्हणण्यापेक्षा खूप म्हटले तरी चालेल. बाजूच्या एका काकांनी मला एकदा घरी बोलवून घेतले. सगळ्यात आधी त्यांनी मला विचारले की तू कोणत्या शाळेत आहे? मीही आपले उत्तर दिले- ''अहो काका, आपल्या शेजारची शाळा नाही का? कमला निंबकर बालभवन. त्याच शाळेत आहे मी. पण तुम्ही असं का विचारताय मला? कोणाला ॲडमिशन घ्यायचं आहे का?'' त्यांनी माझ्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले आणि गंभीर स्वरात म्हणाले, ''कोणी टाकलं तुला त्या शाळेत? तुला माहीत आहे का की त्या जागी आधी कब्रस्तान होतं. आणि...'' ''थांबा काका! मी त्यांना पुढचे काहीच बोलूच दिले नाही आणि पटकन तिथून उठून घरी आले.

घरी आल्यावर तिथे पण काही लोक चर्चा करत होते. मी कान देऊन ऐकले. ते म्हणत होते की रात्री पैंजणाचा छुमछुम आवाज येतो, अचानक झाड खाली वाकते आणि रात्रीच्या वेळेस कोणीतरी दारसुद्धा वाजवते. काही वेळासाठी मीही घाबरले. पण तेवढ्यात आजोबा बोलले, ''कोणी सांगितलं तुम्हाला हे कब्रस्तान वगैरे? भूत, आत्मा ही फालतूगिरी आहे. भूत असतंच तर मला आत्तापर्यंत एक वेळा तरी दिसलं असतं ना? जावा आपल्या आपल्या घरी. भूतबीत काय नसतंय.''

दुसऱ्या दिवशी एक माणूस बोंबलत घरी आला. भूऽऽऽऽत भूऽऽऽऽऽत करत त्याने पूर्ण गल्ली गोळा केली. त्याने आजोबांना सांगितले की त्याला भूत दिसले. मी आजोबांच्या शेजारीच होते. मी लागले हसायला. तो माणूस आधीच खूप घाबरला होता. मी हसायला लागले म्हणून माझ्यावरच भडकला आणि मला म्हणाला,



''काय दात काडती? मला खरंच भूत दिसलंय.'' मग आजोबा म्हणाले, ''अरे! तू स्वतःचंच तोंड आरशात बघितलं असेल त्यामुळे तू एवढा घाबरलास.'' थोड्या वेळानंतर तो शांत झाला.

नंतर तर लोकांना रात्रीचे विचित्र आवाज यायला लागले. काहींनी तर आपल्या वस्त्याच उठवल्या. काही फलटण सोडून गेले. मग आजोबांनी आणि मी निश्चय केला की या सगळ्या गोष्टींमागचे रहस्य आपण शोधायचे.

लगेच दुसऱ्या दिवशी आम्ही कामाला लागलो. कोणाला न कळवताच आम्ही हा उद्योग करत होतो. तीन दिवसांच्या संशोधनातून आम्हाला सगळ्या गोष्टींमागचे कारण मिळाले. मी पटकन गल्लीतल्या सगळ्यांना घरी बोलावून घेतले. सगळे लोक विचारात पडले होते. कोणाचे चेहरे गंभीर होते तर कोणाचे घाबरलेले होते. आजोबा म्हणाले, ''घाबरू नका. तुमचं भूत आम्हाला सापडलं आहे. तुम्हाला रात्री जो पैंजणाचा आवाज येतो तो कोणत्या हडळीचा नाही. आपल्या गल्लीतल्या एका कुत्र्याच्या गळ्यात कुणीतरी घुंगरू बांधले आहे आणि त्याचाच आवाज आपल्याला येतो. आणि दरवाजे कोण ठोकतंय, तर पेताडी माणसं. आणि झाड कशाला खाली वाकतंय? रोज रात्री सिताफळीच्या झाडावर एक घुबड बसतं त्यामुळे फांदी खाली वाकते. बाकी काही विशेष कारण नाही. अशी आहे ही सगळी गंमत.''

पण काही जणांचा आजोबांच्या बोलण्यावर विश्वासच बसेना. मग आजोबा आणि मी म्हणालो, ''कुत्र्याचं शेपूट वाकडं ते वाकडंच...''

**आदीबा तांबोळी,**
इ. सातवी

## आमच्या शेतीची कहाणी

आला आला हिवाळा
मुलांनो, शेतीसाठी पळा
जमीन घेतली नांगरून
पाणी घातले वाफे करून
पावटा लावला वाकून
बिया लावल्या टोकून
हरभरा आला फुलून
पण वानराने घाटे खाल्ले ओढून
आली कोथिंबीर हिरवीगार
ती आवडली सर्वांना फार
पण कोथिंबीर झाली फारच थोडी
भाजीवर घालून चाखली गोडी
पावटा आला टवटवीत छान
पण त्यावर बसली माव्याची रांग
मेथी गेली फारच पुढे
आली तिला पांढरी फुले
गवार गेली जळून
पण मिरची आली भरभरून
एक गोष्ट समजली पक्की
शेती नसते मुळीच सोप्पी!

**सोनल गायकवाड,** इ. सातवी



# तो भयानक दिवस

माझे वडील म्हणजे एक सर्वगुणसंपन्न व्यक्ती. ते वाघोलीला रयत शिक्षण संस्थेच्या शाळेत शिकवतात. संक्रातीच्या आदल्या दिवशी त्यांच्या शाळेची सहल मालवण परिसरात गेली होती. दोन दिवस राहून तिसऱ्या दिवशी ते माघारी येणार होते. तिकडचे खूप फोटो त्यांनी आईला पाठवले. संक्रातीच्या दिवशी रात्री अकराच्या सुमारास ते परत यायला निघाले. इथपर्यंत सगळे ठीक होते, पण परतीच्या प्रवासात असे काही घडले की त्याची कल्पनासुद्धा करवत नाही. पहाटे सहाच्या सुमारास ड्रायव्हरला देव जाणे कशी पेंग लागली... हायवेला टोलनाक्यानंतर तीन किलोमीटरच्या पुढे एका मोठ्या कंटेनरला एसटीची धडक झाली. ड्रायव्हरला अचानक कंटेनर समोर दिसल्यावर ड्रायव्हरने एसटी वळवण्याचा प्रयत्न केला. त्याने केबिन व दरवाजा तर काढला, पण जिथे माझे वडील दोन नंबरच्या सीटवर बसले होते तिथेच धडक झाली आणि एसटीचा पत्रा कापत गेला. त्यांच्या डाव्या मांडीला जोरात दणका बसला होता. डावा पाय पूर्ण खिळखिळा झाला होता. गुडघ्याचे हाड हरवले होते व नसा सगळ्या तुटल्या होता. त्यांचा पाय कसाही गोल-गोल फिरत होता. त्यांना दवाखान्यात नेले. पण नातेवाइकांच्या सहीशिवाय उपचार सुरू होणार नव्हते. लगेच जमादार सरांनी आईला फोन लावला व सांगितले की तुम्ही ताबडतोब कराडच्या कृष्णा हॉस्पिटलमध्ये या, सरांचा ॲक्सिडेंट झाला आहे.

ही बातमी कळल्यानंतर मी खूप हायपर झाले. कोणीच काही नीट सांगत नव्हते. फक्त एवढेच कळले होते की अपघात झाला आहे. मी खूप घाबरले होते. माझ्या मनात अनेक विचार आले, त्यांना जास्त लागलं नसेल ना? त्यांना काही झालं नसेल ना? आता कुठे असतील ते? त्यांच्यावर उपचार चालू असतील ना? मी खूप रडले. नंतर मीच माझ्या मनाला समजावले की जास्त नसेल लागले. त्यांच्यावर कृष्णा हॉस्पिटलमध्ये नीट उपचार होत नव्हते. ते स्वतः म्हणत होते की तुम्ही मला पुण्याला न्या. कदाचित माझा पाय वाचेल. पण तिथले डॉक्टर त्यांना सोडत नव्हते. मग प्रांत सर व पुण्याचे रामसाहेब आले व डॉक्टरांशी बोलले, तेव्हा डॉक्टरांनी त्यांना सोडले. अपघातानंतर डॉक्टरांनी त्यांच्या उजव्या पायाची एक नस काढून डाव्या पायात लावली होती, पण फरक नव्हता.

पुण्याला नेल्यानंतर पाच मिनिटांतच तिथल्या डॉक्टरांनी सांगितले की हा पाय वाचू शकत नाही. काढावा लागेल. त्यांचा गुडघ्याच्या वर पंधरा ते सोळा बोटे इतका पाय कापला. मला हे काहीच माहीत नव्हते. मी त्यांना भेटण्याचा खूप हट्ट केला तेव्हा मला नेले. मी किमान एक महिन्यानंतर त्यांना भेटणार होते. मी जेव्हा माझ्या वडिलांना पाहिले तेव्हा थोड्या वेळात मला जाणवले की त्यांचा पाय नाहीये. त्यांनी पायावर चादर घेतली होती. त्यामुळे मला लवकर कळाले नाही. मी पहिल्यांदा गोंधळले. नंतर मला आवरलेच नाही. माझे डोळे भरून आले. त्यांना वाईट वाटू नये म्हणून मी रडले नाही, जाताना ते मला म्हणाले, ''अभ्यास कर, श्रीची काळजी घे. मी पुढच्या रविवारी येतो.'' मी घरी आले आणि

ओक्साबोक्शी रडले. असं कसं झालं, आता पुढे काय होणार? ते बरे होतील ना? चालतील ना? ते त्यांच्या पायावर उभे राहतील ना? असे प्रश्न सारखे मनात येत होते.

काही दिवसांतच त्यांना हॉस्पिटलमधून गावी नेले. आता त्यांच्या पायाचे प्लॅस्टर काढले होते. पण रॉड असल्यामुळे त्या पायावर बोजा द्यायचा नव्हता. मी काही दिवस त्यांच्यासोबतच राहिले.

अशा थोर, सर्वांना मदत करणाऱ्या माणसासोबत असे इतके वाईट झाले आहे हे कळल्यावर सगळे लोक त्यांना बघायला येत होते. दिवसाला कमीत कमी पन्नास माणसे बघायला यायची. इतके सगळे झाले तरी त्यांनी धीर नव्हता सोडला. उलट तेच माझ्या आजीला धीर देत होते. त्यांनी वास्तव स्वीकारले होते.

एक सांगते. असे काही असते की नाही ते मला माहीत नाही, पण सहलीचे जे फोटो माझ्या वडिलांनी आईला पाठवले होते त्या फोटोंपैकी एका फोटोमध्ये जमिनीवर त्यांच्या पायाची सावली पडली होती. आणि जिथून आता त्यांचा पाय कापला आहे, बरोबर तिथेच चाकूचा आकार झाला होता व थोडा गॅप पडला होता.

असो, जे घडायचे असते ते घडतेच. म्हणतात ना की देव चांगल्यांची परीक्षा घेतो. अजूनही या प्रसंगाचा विचार केला की माझ्या अंगावर काटा येतो.

**श्रेया यादव,**
इ. सातवी

## जगणं

जगणं खारुटलीच्या शेपटीसारखं असावं
मऊ मऊ डौलदार छान पिसासारखं असावं

जगणं किलबिलणाऱ्या पक्ष्यांसारखं असावं
खूप गोंधळ करणारं, बडबडणारं नसावं
मधमाश्यांच्या पोळ्यातल्या गोड मधासारखं असावं
पहिल्या पावसाच्या मातीच्या सुगंधासारखं असावं
शहरातल्या कर्कश आवाजासारखं नसावं
जगणं खारुटलीच्या शेपटीसारखं असावं

जगणं मोराच्या रंगीत पिसासारखं असावं
फटाक्यांच्या धुरासारखं काळवंडलेलं नसावं
समुद्राच्या मंद लाटांसारखं असावं
पाण्यात पोहणाऱ्या माशांसारखं असावं
सूर्याच्या कडक किरणांसारखं नसावं
जगणं खारुटलीच्या शेपटीसारखं असावं

जगणं मातीच्या मूर्तीसारखं असावं
चक्रीवादळासारखं सगळं उध्वस्त करणारं नसावं
विज्ञानाच्या कुतूहलासारखं असावं
पावसाच्या कवितेच्या ओळींसारखं असावं
सतत धावणारं आणि गोंधळलेलं नसावं
जगणं खारुटलीच्या शेपटीसारखं असावं

**आयुक्ती कांगुणे,** इ. सहावी



# सूत्रसंचालनासाठीची वसवस

यंदा तब्बल तीन वर्षांनी शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन होणार होतं. इतक्या वर्षांची राहून गेलेली सगळी मजा, मस्ती, धमाल यावेळी करायची होती. मला तीव्र इच्छा होती ती सूत्रसंचालन करण्याची. म्हणजे नाच तर करायचाच पण सूत्रसंचालक म्हणून मिरवायला मिळेल ते वेगळंच! सगळ्यांची गाणी निवडण्याची लगबग चालू होती. हीच सुवर्णसंधी समजून मी ताईंकडे गेलो आणि म्हणालो की मला या वर्षी सूत्रसंचालन करायचं आहे. ताई म्हणाल्या, साक्षी आणि शिफाला विचारून बघ. त्यांनी दिलं तर दिलं. तेव्हा कुठं मला सगळी हकीकत समजली. त्या दोघींनी खूप आधीच नंबर लावून ठेवला होता आणि त्यांच्याशिवाय इतर कुणालाच सूत्रसंचालन द्यायचं नाही असं ठरवून टाकलं होतं. जेव्हा मला ही गोष्ट समजली तेव्हा माझ्या डोक्यात वणवाच पेटला. मला अस्वस्थ वाटू लागलं. या वर्षात करायची खूप इच्छा असलेली ही एक गोष्ट राहून जाईल की काय असं वाटू लागलं. म्हणून मी त्या दोघींना विनंती करायला गेलो तर त्यांनी चक्क स्पष्ट नकार दिला!

मी भयंकर चिडलो. ताईंना भेटून त्यांना मी माझं म्हणणं पटवून दिलं आणि त्यांचं मन माझ्या बाजूनं वळवलं. ताई साक्षी आणि शिफाला समजावू लागल्या. सार्थकला पण भाग घेऊ द्या असं सांगितलं तर त्या दोघी चवताळल्याच! मला भाग घेता येणार नाही असं त्यांनी जाहीर केलं. ''ताई, तुम्ही आम्हालाच सूत्रसंचालन देणार असं कबूल केलं होतं ना? आपण ॲग्रीमेंट करून त्यावर सही घेऊ असंसुद्धा आपल्यात बोलणं झालं होतं ताई!'' मला खूप हसू येत होतं. त्या बावळटींनी ॲग्रीमेंट केलंच नव्हतं. त्यामुळे मला सूत्रसंचालनात भाग घेण्यापासून त्या रोखू शकणार नव्हत्या.

मला भाग मिळाला. त्या दोघींना ते अजिबात मान्य नव्हतं. पण त्यांचा नाईलाज होता. सासू–सुना जशा एकमेकींना टोचून टोचून बोलतात तसं आमचं सुरू होतं. ''आम्ही ताईंना आधी सांगितलं होतं त्यामुळे आमच्यापेक्षा तुला कमी वाक्यं मिळणार,'' असं त्यांनी मला ठणकावलं. त्या शेर तर मी सव्वाशेर! मी त्यांच्या समजुतीसाठी हे मान्य केलं. मनात म्हटलं, एन्ट्री तर मिळाली आहे. आता आयत्या वेळी काय आणि किती बोलायचं ते मीच ठरवणार!

शिक्षकांशी बोलून, गाण्यांबद्दल इंटरनेटवरून माहिती काढून लेखन करायचं आमचं काम सुरू झालं. मला त्यांच्याएवढीच वाक्यं मिळावी यासाठी माझे प्रयत्न चालूच होते. यासाठी मी दोघींना रोज त्रास द्यायचो. त्यांचा संतापच उडायचा. त्यांनी मला काहीतरी बोल, मग मी त्यांना काहीतरी बोल, असं आमचं रोजच सुरू होतं. अगदी कार्यक्रमाचा दिवस जवळ आला तरी आमच्यात सुसूत्रता नव्हती. कार्यक्रमाच्या दिवशी हातात स्क्रिप्ट होती. कोण काय बोलणार ते त्यावर लिहिलेलं सुद्धा होतं. पण तरी आमचं बॅक स्टेजला बसून तेच सुरू होतं. ''तुला जमत नसेल तर तुझी वाक्यं मला दे,'' असं म्हणत, भांडत भांडत शेवटी कार्यक्रम व्यवस्थित पार पडला.

दुसऱ्या दिवशी सुट्टी होती पण सरांनी जादा तास ठेवला होता. आम्ही सगळे वर्गात बसलो होतो. तेवढ्यात ताई आल्या आणि कार्यक्रमाविषयी सांगू लागल्या. मी आणि शिफा

आम्ही दोघांनी बोलण्यात गडबड केली होती. मी कव्वालीच्या ऐवजी 'कवल्ली' म्हणालो होतो आणि शिफा द. मा. मिरासदारांच्या ऐवजी 'द. मा. मिसरदार' बोलून गेली होती. हे ऐकून सगळा वर्ग एका सुरात हसू लागला.

काहीही असो, सूत्रसंचालनासाठी आमची वसवस, चिकटपणा, वादविवाद आणि त्याचा प्रत्यक्ष अनुभव या सगळ्याची मजा काही औरच होती!

**सार्थक जाधव,** इ. नववी



## मोबाइलचं वेड

बदलली आहे आज पूर्ण आमची लाइफस्टाइल
याचा किमयागार कोण? नाव त्याचं मोबाइल
रील्स बनवायचं आणि बघायचं लागलंय आम्हाला खूळ
मोबाइलशिवाय याचं दुसरं काय आहे मूळ?
काय करू? कसं करू? सुचत नाही काही
ॲप्सशिवाय जगात दुसरं दिसत नाही काही
स्क्रीनटाइम कमी करायला वर्कशॉपही केलं
पण प्रत्यक्षात करून बघणं फारच कठीण गेलं
मोबाइलमुळे आज आमचा झालाय मेंदू हॅक
लक्षात नाही किती स्टेटस बघितले बॅक टू बॅक
मोबाइलच्या वापरावर ठेवायला हवा ताबा
आताच नाही केलं तर नंतर होईल तोबा
वेळेचं नियोजन आता केलं आहे मी सुंदर
अभ्यास, छंद, कुटुंब, मित्र, मगच त्याचा नंबर!

**समृद्धी पटवर्धन,** इ. नववी

## अपेक्षांपेक्षा...

जन्माच्या आधीपासून
मनात जी चालू असते
तीच तर असते अपेक्षा
आईच्या गर्भात तयार झाल्यापासून
होतात सुरू अपेक्षा...

मुलगा असेल की मुलगी?
दिवा असेल की पणती?
मुलगा झाला तर कोण होणार?
मुलगी झाली तर काय होणार?
मुलांआधीच का जन्म घेतात अपेक्षा?

होऊ द्या ना मुले मोठी
मग करू दे त्यांना विचार
लादू नका त्यांच्यावर तुमच्या चिंता
काय होणार? कसं होणार?
यापेक्षा...
पूर्ण करू द्या त्यांना
त्यांच्या अभिलाषा!

**मयुरेश कुंभार,** इ. आठवी



दुपारची वेळ होती. मी व माझे कुटुंब रायगडला चाललो होतो. बराच वेळ गेला, रस्त्यावर चिटपाखरूही दिसत नव्हते. आख्खा रस्ता निर्मनुष्य होता. ना कसला आवाज... ना कसली हालचाल. फक्त भयाण शांतता.

वीस–पंचवीस किलोमीटर पुढे आल्यावर 'रायगड' पाटी असणारी एक एसटी बस दिसली. हायसे वाटले. आम्ही बसच्या मागे मागे जाऊ लागलो. पण एका फाट्याशी आल्यावर ती कुठे गेली काय माहीत! ना इंजिनचा आवाज, न कसली घरघर... क्षणार्धात गायब झाल्यासारखी! फाट्यापाशी एक म्हातारा माणूस दिसला. माणूस बघून जरा बरे वाटले. त्याला आम्ही विचारले की एसटी दिसली का. तो नाही म्हणाला. आम्ही हबकलोच!

